MHYA010028332024

दाखल तारीख : २४/१२/२०२४
नोंदणी तारीख : २६/१२/२०२४
निकाल तारीख : १०/०४/२०२६
कालावधी : वर्ष महीने दिवस
०१ ०३ १७

**<u>भाग -अ</u>**

**[ परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ यांचे न्यायालयात.**
(पिठासीन अधिकारी : पी.एस.इंगळे )

**सत्र खटला क्रमांक १३९/२०२४** **निशाणी क्रमांक -**

| न्यायनिर्णय दिनांक : १०/०४/२०२६ | |
|---|---|
| **फिर्यादी पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे,**<br>पोलीस स्टेशन वडगाव रोड,<br>जि. यवतमाळ. |
| **फिर्यादी पक्षातर्फे अभियोक्ता** | श्रीमती एस. व्ही. दरणे |
| **- विरूद्ध -** | |
| **आरोपी** | **१. महेश शंकरराव पवार,**<br>वय – ४३ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. गुरुदेव वार्ड घाटंजी, ता.घाटंजी, जि. यवतमाळ.<br>**२. विश्वास सोपानराव निकम,**<br>वय – २७ वर्षे, धंदा – फोटोग्राफी,<br>रा. देवधरी, पो.स्टे पारवा, जि. यवतमाळ.<br>**३. प्रशांत दिलीपराव मस्के,**<br>वय – ३० वर्षे, धंदा – मजूरी,<br>रा. धर्मशाळा वार्ड, घाटंजी, जि. यवतमाळ.<br>**४. राजु मनोहर राउत,**<br>वय – ४४ वर्षे, धंदा – मजूरी,<br>रा. गुरुदेव वार्ड, घाटंजी, जि. यवतमाळ.<br>**५. मनोज नारायण राठोड,**<br>वय – ४४ वर्षे, धंदा – समाजसेवा,<br>रा. कोळी खुर्द, ता.घाटंजी, जि. यवतमाळ. |

| | |
|---|---|
| | **६. मनिषा वाल्मीकराव काटे,**<br>वय – २८ वर्षे, धंदा –समाजसेवा,<br>रा. मावळणी, कळंब, जि. यवतमाळ.<br>**७. लता दत्तात्रय चौधरी,**<br>वय – ५० वर्षे, धंदा – घरकाम,<br>रा. शिरोली, ता. घाटंजी, जि. यवतमाळ.<br>**८. सौ. सुषमा प्रमोद गाढवे,**<br>वय – ३८ वर्षे, धंदा – मजूरी,<br>रा. वाटखेड, बाभुळगाव, जि. यवतमाळ. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | ॲड. श्री. एन. पी. चवरडोल |

## भाग -ब
## [ परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ०७/०४/२०१७ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०७/०४/२०१७ |
| फिर्याद दिनांक | २८/०७/२०१७ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | १९/१२/२०२५ |
| दोषारोप पुर्वीच्या पुरावा दिनांक | निरंक |
| न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | १०/०४/२०२६ |
| शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर | ..... |

## आरोपीचा तपशील

| अ.क्र | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा / आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी फौ.प्र.सं.क. ४२८नुसार सुट देणेकरीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | महेश शंकरराव पवार, | ०७/०४/१७ | १०/०४/१७ | भारतीय दंड संहितेचे कलम ३५३, ३३२, १४३, १४५ सहवाचित कलम ३४ प्रमाणे | आरोपीस निर्दोष सोडण्यात आले. | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | विश्वास सोपानराव निकम, | -"- | -"- | -"- | -"- | -"- | -"- |
| ३. | प्रशांत दिलीपराव मस्के, | -"- | -"- | -"- | -"- | -"- | -"- |
| ४. | राजु मनोहर राउत, | -"- | -"- | -"- | -"- | -"- | -"- |
| ५. | मनोज नारायण राठोड, | -"- | -"- | -"- | -"- | -"- | -"- |
| ६. | मनिषा वाल्मीकराव काटे, | -"- | -"- | -"- | -"- | -"- | -"- |
| ७. | दत्ता दत्तात्रय चौधरी, | -"- | -"- | -"- | -"- | -"- | -"- |
| ८. | सौ. सुषमा प्रमोद गाढवे, | -"- | -"- | -"- | -"- | -"- | -"- |

## न्यायनिर्णय

**(दिनांक १०/०४/२०२६ रोजी घोषित)**

या प्रकरणामध्ये आरोपींच्या विरोधात भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम ३५३, ३३२, १४३, १४५ व १४७ सहवाचित कलम ३४ प्रमाणे होणा-या अपराधांबाबतचा खटला चालविण्यात आला.

२. फिर्यादीचे प्रकरण थोडक्यात असे की घटना दिनांक ०७.०४.२०१७ रोजी दुपारी १२.१५ वाजताच्या दरम्यान श्री मदन येरावार यांच्या घरासमोर, अवधूतवाडी, यवतमाळ येथे घडली. तक्रारकर्ते उमेश शंकरराव नासरे हे घटनेच्या वेळी पोलीस उपनिरिक्षक या पदावर पोलीस स्टेशनला कार्यरत असतांना, उपविभागीय पोलीस अधीकारी यांनी माहीती व आदेश दिला की स्वाभिमानी संघटनेचे कार्यकर्ते हे पालकमंत्री

श्री मदन येरावार यांचे घरा समोर आंदोलन करणार आहेत. सबब, स्टेशन डायरीमध्ये नोंद घेवून तक्रारकर्ते उमेश नासरे, पोलीस कॉन्सटेबल २०१२, ९७१, २०५९, महिला पोलीस शिपाई १८८७ हे सर्व पालक मंत्री श्री मदन येरावार यांचे घरा समोर अवधूतवाडी येथे गेले. तेथे त्यांना तिन महीला व पाच ते सहा पुरूष आपले हातात रिकाम्या बियर व दारूच्या बॉटल घेवून दारूबंदी करण्याबाबत घोषणा देत निवेदन देण्याकरिता आले. त्यांच्या हालचाली आक्रमक दिसत असल्याने त्या ठिकाणी हजर असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी श्री पियुष जगताप व पोलीस निरिक्षक श्री देविदास ढोले यांनी सदर आंदोलकांना पालक मंत्री श्री मदन येरावार हे निवासस्थानी हजर नाही असे सांगून त्यांना आत जाण्यास मनाई केली असता सर्व आंदोलक हे आक्रमक झाले व गणवेशातील हजर पोलीस कर्मचा–यांशी व अधिका–यांशी हुज्ञत घालून धक्काबूक्की करीत होते. त्यांच्या सोबत आणलेल्या रिकाम्या बियर व दारूच्या बाटल्या पालकमंत्री यांच्या निवासस्थानासमोर रोडवर फोडुन शासकीय काम करित असतांना पोलीसांना धक्काबूक्की करून त्यांना गोंधळ घातला. त्यामुळे तक्रारकर्ते उमेश नासरे यांनी त्यांना ताब्यात घेवून त्यांना पोलीस स्टेशनला हजर केले व त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव १) महेश शंकरराव पवार, २) विश्वास सोपानराव निकम, ३) प्रशांत दिलीपराव मस्के, ४) राजु मनोहर राउत, ५) मनोज नारायण राठोड, ६) कु. मनिषा वाल्मीकराव काटे, ७) श्रीमती लता दत्तात्रय चौधरी आणि ८) सौ सुषमा प्रमोद गाढवे असे सांगीतले आहे. सबब, उपरोक्त आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवत कुठल्याही प्रकारची शासनाची परवानगी न घेता पालक मंत्री मदन येरावार यांचे घरासमोरील रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी पोलीसांच्या सूचना न पाळता त्यांच्यासोबत हुज्ञत घालून पोलीसांना धक्काबुक्की केली व रस्त्यावर बियर व दारुच्या काचेच्या बॉटल फोडून काही वेळेकरीता कायद्या व सुव्यवस्था बाधीत होईल अशी स्थिती निर्माण केली. सबब, तक्रारकर्ते उमेश नासरे यांनी आरोपींच्या विरोधात संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये कैफियत दिली. कैफियत प्राप्त झाल्यानंतर, पोलीसांनी घटनेचा तपास केला. तसेच साक्षीदारांची बयाने नोंदविली.

तपासाअंती, पोलीसांनी आरोपींच्या विरोधात दोषारोपपपत्र न्यायालयात दाखल केले.

३. आरोपींच्या विरोधात भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम ३५३, ३३२, १४३, १४५ व १४७ सहवाचित कलम ३४ प्रमाणे होणा-या अपराधांबाबतचे आरोप निश्चित केले व ते आरोपींना वाचुन व समजावून सांगण्यात आले. मात्र, आरोपींनी ते कबुल नसल्याचे सांगून खटला चालविण्याची तयारी दर्शवली.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे नोंदविण्यात आलेल्या आरोपींच्या बयाणावरून, आरोपींचा बचाव खोटया प्रकरणामध्ये गोवल्याचा तसेच संपूर्ण नकाराचा असल्याचे स्पष्ट होते.

५. प्रकरणाचे अवलोकन केले व दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. त्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालील प्रमाणे आहेतः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | फिर्यादीने असे सिध्द केले काय की ०७.०४.२०१७ रोजी दुपारी १२.१५ वाजताच्या दरम्यान श्री मदन येरावार यांच्या घरासमोर, अवधूतवाडी, यवतमाळ येथे आरोपींनी त्यांचा समान उददेश साध्य करण्याच्या दृष्टीने आरोपींनी तक्रारकर्ते उमेश नासरे व इतर पोलीस कर्मचारी व अधिकारी हे लोकसेवक म्हणून आपले कर्तव्य बजावत असतांना त्यांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने त्यांच्यावर हल्ला किंवा फौजदारी पात्र बलप्रयोग केला व त्याव्दारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३५३ सह वाचीत कलम ३४ प्रमाणे होणारा अपराध केला ? | … नाही |
| २. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपींनी त्यांचा समान उददेश साध्य करण्याच्या दृष्टीने आरोपींनी तक्रारकर्ते उमेश नासरे व इतर पोलीस कर्मचारी व अधिकारी हे लोकसेवक म्हणून आपले कर्तव्य पार पाडीत असतांना त्यांना त्यांचे कर्तव्य | |

| | | |
|---|---|---|
| | पार पाडण्यास प्रतिबंध करण्याच्या उददेशाने त्यांना धक्काबुक्की करुन त्यांना ईच्छापूर्वक दुखापत पोहचविली व त्याव्दारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३३२ सह वाचीत कलम ३४ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| ३. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते आणि त्या जमावाचा समान उद्देश वर नमूद केलेल्या लोकसेवकांना त्यांचे कर्तव्य बजावत असतांना त्यांच्यावर हल्ला करणे किंवा फौजदारी बळाचा वापर करणे तसेच दंगलीचा गुन्हा करणे हा होता आणि त्याव्दारे आरोपींनी भारतीय दंड संहिता संहिता, १८६० चे कलम १४३ सह वाचित कलम ३४ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| ४. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी बेकायदेशीर जमावाचे सदस्य असतांना, त्या जमावास कायद्याने निर्धारीत केलेल्या पध्दतीने पांगण्याचा आदेश दिलेला आहे, हे माहित असून सुध्दा आरोपी त्याच सहभागी होती आणि त्याव्दारे आरोपींनी भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४५ सह वाचित कलम ३४ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| ५. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी बेकायदेशीर जमावाचे सदस्य असतांना, आरोपींनी उपरोक्त लोकसेवकांवर त्यांच्या कर्तव्याच्या अंमलबजावणी दरम्यान त्यांना धक्काबुक्की केली आणि त्याव्दारे आरोपींनी भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४७ सह वाचित कलम ३४ प्रमाणे होणारा दंगलीचा अपराध केला ? | ... नाही |
| ६. | काय आदेश ? | आरोपींना दोषमुक्त करण्यात आले. |

## -: निष्कर्षांची कारणे :-

**मुद्दा क्रमांक १ ते ५ च्या बाबत** :–

६. या प्रकरणातील वस्तुस्थितीचा, उपलब्ध पुराव्याचा विचार करता तसेच पुनरावृत्ती टाळण्याकरीता, मी मुद्दा क्रमांक १ ते ५ वर एकत्रीतरित्या चर्चा करीत आहे.

७. उपरोक्त अपराधांचे आरोप सिध्द करण्याकरीता पोलीस उप निरीक्षक आणि तक्रारकर्ते उमेश (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान असे सांगितले की त्यांना उपविभागीय अधिकारी यांनी फोन द्वारे सांगितले की पालकमंत्री मदन येरावार यांच्या घरासमोर स्वामिनी संघटनेचे कार्यकर्ते आंदोलन करीत आहेत. उमेश (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सुद्धा सांगितले की त्यांनी पोलीस स्टेशन डायरीला नोंद केली व ते पोलीस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी गेले. त्यांनी असे सुद्धा त्यांच्या पुराव्या दरम्यान सांगितले की घटनास्थळावर उपविभागीय अधिकारी पियुष पोलीस निरीक्षक श्री ढोले हे अगोदरच उपस्थित होते. उमेश (फि.सा.क्र.२) यांनी असे सुद्धा त्यांच्या पुराव्यादरम्यान सांगितले की त्यावेळी आरोपी महेश शंकरराव पवार, विश्वास निकम, प्रशांत मस्के, राजू राऊत आणि इतर आरोपी हजर होते व त्यांनी त्यांना सांगितले की पालकमंत्री घरी नाहीत. त्यामुळे त्यांनी त्यांच्या हातातील दारूच्या बॉटल्स फोडल्याचे व पोलीस कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केल्याचे त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान सांगितले.

८. उमेश (फि.सा.क्र.२) यांच्या उपरोक्त पुराव्याव्दारे असे स्पष्ट होते की त्यांनी घटनास्थळावर कथितपणे हजर असलेल्या फक्त चार आरोपींचीच नावे स्पष्टपणे सांगीतलेली आहे. वास्तविक, या प्रकरणामध्ये एकूण आठ आरोपी असून उमेश (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान सर्व आठ आरोपींची नावे सांगणे अपेक्षीत होते. मात्र, त्यांनी त्यांच्या पुराव्या दरम्यान फक्त चार आरोपींचीच नावे सांगीतल्याने उर्वरीत चार आरोपींच्या या प्रकरणातील कथित गुन्हयामधील कथित सहभागाबाबत शंका निर्माण होते. सबब, उमेश (फि.सा.क्र.२) यांचा उपरोक्त पुरावा शंका निर्माण करणारा

असल्यामुळे फिर्यादीस कोणत्याही उपयोगाचा ठरणार नाही.

९. याशिवाय, उमेश (फि.सा.क्र.२) यांनी दिलेल्या उपरोक्त पुराव्यास त्यांच्याच सहका-यांनी म्हणजेच महिला पोलीस शिपाई प्रतिभा (फि.सा.क्र.१) यांनी पुष्टी दिलेली नाही. यासाठी, मी प्रतिभा (फि.सा.क्र.१) यांनी दिलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करीत आहे. प्रतिभा (फि.सा.क्र.१) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान फक्त स्वामिनी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांना धक्काबुक्की केल्याचे व त्यामुळे सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचे त्यांनी सांगितले. प्रतिभा (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कुठेही असे सांगितलेले नाही की आरोपींनी पोलीस कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केली तसेच आरोपींनी सरकारी कामामध्ये अडथळा निर्माण केला. अशा परिस्थितीमध्ये, प्रतिभा (फि.सा.क्र.१) यांचा पुरावा फिर्यादीस कोणत्याही उपयोगाचा ठरणार नाही व त्यांच्या पुराव्याद्वारे आरोपींच्या विरोधात कोणत्याही अपराधाचे आरोप सिद्ध होत नाहीत. सबब, उमेश (फि.सा.क्र.२) यांनी दिलेला पुरावा पुष्टी विरहीत असल्यामुळे त्यांचा पुरावा तसेच प्रतिभा (फि.सा.क्र.१) यांचा पुरावा फिर्यादीस कोणत्याही उपयोगाचा नाही.

१०. याशिवाय, प्रतिभा यांनी त्यांच्या उलट तपासणी दरम्यान असे कबूल केले की पालकमंत्री मदन येरावार यांच्या घरासमोर सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये, तपास अधिकारी सुगत (फि.सा.क्र.४) यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फूटेज जप्त करुन त्याव्दारे आरोपींचा कथित गुन्हयातील सहभाग सिध्द करावयास पाहिजे होता. मात्र, सुगत (फि.सा.क्र.४) यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फूटेज जप्त केलेले नाही. या सर्व बाबी, फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करणा-या आहे.

११. सुनील (फि.सा.क्र.३) घटनास्थळ पंचनामा वरील पंच असून त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान सांगितले की त्यांच्यासमोर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा तयार केला व त्या पंचनाम्यामधील मजकूर बरोबर आहे. मात्र, सुनील (फि.सा.क्र.३)

यांनी त्यांच्या उलट तपासणी दरम्यान असे कबूल केली की त्यांच्यावर अवैध वरली मटका चालवण्याची फौजदारी प्रकरणे असून वडगाव रोड पोलीसांनी त्यांना जे सांगितले ते त्यांना न्यायालयात बोलावेच लागते. तसेच सुनील (फि.सा.क्र.३) यांनी त्यांच्या उलट तपासणी दरम्यान असे सुद्धा मान्य केले की घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहिती नाही तसेच पोलीसांनी पंचनामा मधील मजकूर त्यांना वाचून दाखविला नाही तसेच पोलीसांच्या सांगण्यावरून त्यांनी त्यांच्या सरतपासणीमधील मजकूर सांगितला. थोडक्यात, सुनील (फि.सा.क्र.३) यांच्या उपरोक्त पुराव्याचा विचार करता, असे स्पष्ट होते की त्यांनी त्यांचा पुरावा पोलीसांच्या सांगण्यावरून दिलेला असून त्यांना घटनास्थळ पंचनामातील मजकूर माहित नाही. अशा परिस्थितीमध्ये, सुनील (फि.सा.क्र.३) यांचा पुरावा फिर्यादीस कोणत्याही उपयोगाचा ठरणार नाही.

१२. सुगत(फि.सा.क्र.४) हे तपास अधिकारी असून त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सांगितले की त्यांनी घटनास्थळ पंचनामा पंचांसमक्ष तयार केला तसेच त्यांनी साक्षीदारांची बयाने नोंदवून आरोपींच्या विरोधात दोषारोप पत्र न्यायालयामध्ये दाखल केले. सुगत (फि.सा.क्र.४) यांनी घटनास्थळ पंचनामा पंचांसमक्ष तयार केल्या बाबत दिलेला पुरावा विश्वासार्ह नाही, कारण घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच सुनील (फि.सा.क्र.३) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे कबूल केलेले आहे की वडगाव रोड पोलीसांनी जे त्यांना सांगितले तेच त्यांना न्यायालयात बोलावेच लागते, तसेच त्यांना घटनास्थळ पंचनामा मधील मजकूर माहिती नाही आणि तो मजकूर पोलीसांनी त्यांना वाचून दाखविला नाही.

१३. याशिवाय, सुगत (फि.सा.क्र.४) यांनी त्यांच्या उलट तपासणी दरम्यान असे कबूल केले की पोलीस उपनिरीक्षक उमेश (फि.सा.क्र.२) व इतर पोलीस कर्मचारी घटनास्थळी गेल्या बाबतची पोलीस स्टेशन डायरीची नोंद त्यांनी प्राप्त केली नसून त्या स्टेशन डायरीची प्रत त्यांनी या प्रकरणात दाखल केलेली नाही. तसेच सुगत (फि.सा.क्र.४) यांनी असे सुद्धा कबूल केले की पोलीस उपनिरीक्षक उमेश (फि.सा.क्र.२)

व महिला पोलीस कॉन्स्टेबल प्रतिभा (फि.सा.क्र.१) हे दिनांक ७/०४/२०१६ रोजी कर्तव्यावर हजर असल्याबाबतची कागदपत्रे त्यांनी दोषारोप पत्रासोबत दाखल केली नाही. तसेच, प्रतिभा (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या उलट तपासणी दरम्यान असे कबूल केले की कथित घटनेच्या वेळी त्या कर्तव्यावर हजर असल्याबाबत चे दस्तऐवज त्यांनी तपास अधिकाऱ्यांना दिले नाही. याशिवाय, उमेश (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या पुरावा दरम्यान असे सुद्धा कबूल केले की ते घटनास्थळी कर्तव्यावर गेल्या बाबतचे दस्तऐवज त्यांनी तपास अधिकाऱ्यांना दिले नाही. थोडक्यात, प्रतिभा (फि.सा.क्र.१),उमेश (फि.सा.क्र.२) आणि सुगत (फि.सा.क्र.४) यांच्या पुराव्याद्वारे असे स्पष्ट होते की प्रतिभा (फि.सा.क्र.१) उमेश (फि.सा.क्र.२) हे कथित घटनेच्या वेळी शासकीय कर्तव्यावर घटनास्थळी हजर असल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा तपास अधिकारी सुगत (फि.सा.क्र.४) यांनी प्रकरणांमध्ये दाखल केलेला नाही. सबब, प्रतिभा (फि.सा.क्र.१),उमेश (फि.सा.क्र.२) हे कथित घटनेच्या वेळी कथित घटनास्थळावर शासकीय कर्मचारी म्हणून कर्तव्यावर हजर असल्याची बाब फिर्यादी तर्फे सिद्ध करण्यात आलेली नाही व त्यामुळे भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५३ व ३३२ मधील महत्त्वाचे घटकच फिर्यादीतर्फे माफक संशयापलीकडे, सिद्ध करण्यात आलेले नाहीत. तसेच उपलब्ध पुराव्याचा विचार करता फिर्यादीतर्फे आरोपींच्या विरोधात असलेल्या वर उल्लेखीत सर्व अपराधांचे आवश्यक घटक, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाही.

१४. याशिवाय, उमेश (फि.सा.क्र.२) यांनी त्यांच्या उलट तपासणी दरम्यान असे कबूल केले की पालकमंत्री श्री मदन येरावार यांचे घर मुख्य रस्त्यावर वस्तीमध्ये आहे व त्यांच्या घराच्या आजूबाजूला दुकाने व दवाखाने असून श्री. मदन येरावार यांच्या घराजवळ वर्दळ चालू असते व श्री मदन येरावार यांच्या घराजवळ असलेल्या दुकानांमध्ये लोकांचे येणे जाणे चालू असते. तसेच प्रतिभा (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या उलट तपासणी दरम्यान पुढे असे सुद्धा कबूल केले की मदन येरावार यांच्या घराच्या आजूबाजूला दुकाने व बरीचशी घरे आहेत. या पुराव्याचा विचार करता, तपास अधिका-यांनी स्वतंत्र साक्षीदारांची

बयाने ते उपलब्ध असतांना सुध्दा नोंदविली नाही. ही बाब सुध्दा फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करणारी आहे.

१५. प्रकरणात उपरोक्त साक्षीदारांनी दिलेल्या पुराव्याचा विचार करता, सरकारी वकिलांनी पुरसिस निशाणी क्रमांक ५२, दाखल करुन फिर्यादीच्या पुराव्याची बाजू बंद केली. या सर्व पार्श्वभुमीचा विचार करता तसेच प्रकरणात उपलब्ध पुराव्याचा विचार करता, मी असे ठरवितो की फिर्यादीने आरोपींच्या विरोधात असलेले उपरोक्त अपराधांचे आवश्यक घटक,माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ५ चे उत्तर मी नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक ६ च्या बाबत** :–

१६. प्रकरणात उपलब्ध पुराव्याचा विचार करता, मी अगोदरच असे ठरविले आहे की फिर्यादीने आरोपींच्या विरोधात असलेले आरोप, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाहीत. सबब, मी आरोपींना संशयाचा फायदा देत आहे. म्हणून आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामतः, मुद्दा क्र. ६ चे उत्तरार्थ, मी खालील आदेश पारीत करीत आहेः-

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | आरोपींना भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम ३५३, ३३२, १४३, १४५ व १४७ सहवाचित कलम ३४ प्रमाणे होणा-या अपराधाच्या आरोपातून, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये, दोषमुक्त करण्यात आले. |
| २ | आरोपींची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात यावी. |
| ३ | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे पुर्तता करावी. |

दिनांक - १०/०४/२०२६

PREMTUSHAR SAMADHANRAO INGLE
Digitally signed by PREMTUSHAR SAMADHANRAO INGLE
Date: 2026.04.10 18:25:47 +0530

(पी. एस. इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

**भाग -क**
**[ परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**
**अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| फि.सा.क्र.१ | प्रतिभा गणपतराव मडावी (नि.क्र.३०) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| फि.सा.क्र.२ | उमेश शंकरराव नासरे (नि.क्र.३१) | तक्रारकर्ते व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| फि. सा.क्र.३ | सुनिल कन्हैया मेडवे (नि.क्र.४०) | घटनास्थळ पंच |
| फि. सा.क्र.४ | सुगत नाथराव पुंडगे (नि.क्र.४२) | तपास अधिकारी |

**ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३२ | कैफियत |
| २. | ३३ | प्रथम वर्दी अहवाल |
| ३. | ४१ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | ४३ | वैद्यकीय तपासणी पत्र |
| ५. | ४४ ते ५१ | अटक फॉर्म |

**ब. बचाव पक्ष :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुददेमाल :**

| **अनुक्रमांक** | **मुददेमाल क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**CERTIFICATE**

"I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. D.S. Kurzadkar/Kolhe<br>Stenographer Grade-I |
| Name of the Court | Ad-hoc District Judge-1,<br>Yavatmal |
| Date of Signature of Presiding Officer | 10/04/2026 |
| Date of Judgment Uploaded | 10/04/2026 |

DIPALI SOMESHWAR KOLHE
Digitally signed by DIPALI SOMESHWAR KOLHE
Date: 2026.04.10 18:27:44 +0530

दिनांक - १०/०४/२०२६

(दि.सु.कोल्हे)
लघुलेखक श्रेणी-१, यवतमाळ.
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, यवतमाळ.